**डॉ. अरूण निगवेकर**
**अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली**
**१ फेब्रुवारी, २००३**

माननीय कुलगुरू डॉ. एम.जी. ताकवले, माननीय प्र. कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे, अधिसभेचे, विद्वत परिषदेचे व इतर अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, आज उपस्थित असणाऱ्या स्थानिक महत्त्वाच्या व्यक्ती, उपस्थित स्नातक आणि बंधु–भगिनींनो,

शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या पदवी प्रदान समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मला आमंत्रित केल्याबद्दल मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. करवीर नगरीतच मी वाढलो असल्याने मला याचे जास्त महत्त्व वाटते. कोल्हापूर हे कलेचे माहेरघर आहे. तसेच प्रगतिशील शेतकरी आणि हुशार तंत्रज्ञ यांचा पण या शहराच्या वाढीत भरीव वाटा आहे. एक रांगडी परंतु, मोकळी आणि प्रगतिशील संस्कृती असलेले शहर म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. सामाजिक समतेची प्रथम सुरूवात याच शहरात झाली. त्याचप्रमाणे कला आणि साहित्याच्या क्षेत्रातही या शहराची एक वेगळीच छाप आहे. या शहराने शाहू महाराजांसारखे द्रष्टे दिले, तर कलामहर्षी भालजी पेंढारकर, बाबूराव पेंटर, आबालाल रेहमान तसेच थोर साहित्यिक वि.स.खांडेकर, अल्लादियाँ खाँ, केशवराव भोसले, गानतपस्वी दीनानाथ मंगेशकर, कर्मयोगी म्हादबा मेस्त्री, शिक्षणतज्ज्ञ बाळासाहेब खर्डेकर यांच्यासारखी वेगवेगळ्या क्षेत्रातील अग्रगण्य माणसे पण याच करवीर नगरीने दिली. कुस्तीचे माहेरघर असलेले हे शहर दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. अशा या गुणी शहरात ४० वर्षापूर्वी शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. हे विद्यापीठ दक्षिण महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावीत आहे. यापुढील काळामध्ये नवीन आव्हानासं आपणांस सामोरे जावयाचे आहे. सध्याच्या ज्ञानयुगात नवीन अभ्यासक्रम आता अनिवार्य झाले आहेत. वर्गात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील विचारांच्या आदानप्रदानाचा दर्जा वाढविण्यास माहितीशास्त्र व तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग होऊ शकतो. आणि म्हणूनच मागील महिन्याच्या २८ तारखेस पंतप्रधानांच्या उपस्थितीत यू.जी.सी.इन्फोनेट ची स्थापना झाली. भारतातील सर्व विद्यापीठे या माहितीच्या जाह्यांच्या घटक बनली आहेत. ज्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग विकास निधी देते, अशा महाविद्यालयांनासुद्धा या नेटवर्क्सचा फायदा मिळेल. मला जाहीर करण्यास आनंद होत आहे की, शिवाजी विद्यापीठात VSAT-B बसविला जाईल व आपणांस संदेश दळणवळण करण्याकरिता पहिल्या टप्प्यात १२८ इतकी बँड विड्थ उपलब्ध करून दिली जाईल. या सर्व पायाभूत सुविधांचा भांडवली खर्च विद्यापीठ अनुदान आयोग करेल.

त्याचप्रमाणे पुढील पाच वर्षे बँड विड्थचे भाडेही यू.जी.सी.देईल. महाविद्यालये तसेच विद्यापीठातील विषय विभागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास याचा सुजाणपणे वापर करणे हे मात्र आपल्याच हातात आहे. संशोधनाकरिता या नेटवर्कच्या माध्यमातून संशोधन मासिके आणि माहिती सामुग्री आपणांपर्यंत मोफत पोहोचणार आहे. मला खात्री आहे, शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षक या सुविधांचा योग्यप्रकारे वापर करतील. विद्यापीठाचे व्यवस्थापन पण या नेटवर्कच्या माध्यमातून विकेंद्रीत आणि गतिशील होणार आहे.

आजच्या पदवी प्रदान समारंभाच्या भाषणात मी उच्च शिक्षणाबाबत चर्चा न करता, एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयावर माझी मते व्यक्त करणार आहे. आणि तो विषय आहे, विकसित भारत हे मृगजळच ठरणार आहे का आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ५० पेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. १९४७ सालातील भारत आणि आजचा भारत यात जमीन आस्मानचा फरक आहे. गरीब व भुक्या, कंगालांचा देश. गेल्या ५० वर्षात विकसनशील अवस्थेतून आता एका उदयोन्मुख देशात गणला जाऊ लागला आहे आणि हे सर्व सामाजिक, आर्थिक व राजकीय बाबतीत झाले आहे. आज जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश म्हणून आपल्याकडे पाहिले जाते. एकाप्रकारची राजकीय प्रगल्भता असलेला आणि आर्थिक स्थैर्य येऊ घातलेला देश असे भारताचे वर्णन केले जात आहे. आशिया खंडात आपला देश ताकद ठरू लागला आहे. जागतिक पातळीवर पण भारताला आता महत्त्व प्राप्त झाले आहे. असे जरी असले तरी भारताबाबत सर्वांच्या मनात अजूनही खूपच शंका आहेत. भारताने केलेल्या विकासाबाबत कित्येक तज्ज्ञांना आश्चर्य वाटते. स्टीफेन कोहेन नामक एका राजकीय आणि आंतरराष्ट्रीय अमेरिकन तज्ज्ञाने आपल्या भारत : एक उदयोन्मुखी शक्ती, या पुस्तकात भारताने केलेल्या प्रगतीचे चांगले विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते पुढील कांही दशकांत भारत सर्वच दृष्टीने एक महान शक्ती ठरेल. तर इतर अनेक तज्ज्ञांच्या मताने, यामध्ये आपल्या देशातील आणि बाहेरच्या देशातील तज्ज्ञांचा समावेश आहे. भारत अजून कित्येक दशके एक सुमार आणि दुसऱ्या दर्जाचा देश म्हणून गणला जाईल. त्यांच्या मते जबरदस्त लोकसंख्या, अगणित भाषा, पन्नास हजार छोट्या–मोठ्या जाती–जमाती, पन्नास हजार खेडी आणि धार्मिक गोंधळ या सर्वांच्या ओझ्याखाली भारत इतका दबला आहे की, आणखी कांही वर्षात त्याच्यात विभाजन होईल. जगातील एक प्रचंड लोकशाही नष्ट होईल आणि आपल्याबरोबर संपूर्ण आशियामध्ये एकप्रकारची अस्थिरता निर्माण होईल.

तसे बघितले तर वर उल्लेखिलेले सर्व प्रश्न गेली पन्नास वर्षे भारताच्या विकासातील अडथळे ठरले आहेत. परंतु, भारताच्या विकासातील सर्वात कच्चा दुवा म्हणजे आर्थिक अस्थिरता

ठरला आहे. याची कारणे स्वातंत्र्यपूर्व इतिहासात दडली आहेत. स्वातंत्र्यानंतर आपण समाजवादाचा पुरस्कार केला. आपली आर्थिक धोरणे ही डाव्या विचारसरणीचे अर्थतज्ज्ञ आणि ब्रिटीश राजवटीत तयार झालेली नोकरशाही यांनी ठरविली. त्या काळात समाजाच्या गरजा भागविण्याकरिता ज्या ज्या वस्तू किंवा इतर गोष्टी लागतील, त्यांची निर्मिती व वाटप सरकारने स्वत: किंवा सरकारने निर्माण केलेल्या यंत्रणेने करावे असे धोरण अवलंबिले गेले. याचा परिणाम म्हणजे अगदी रोज लागणाऱ्या ब्रेडपासून ते सिमेंट, लोखंड इत्यादी सर्व गोष्टींची निर्मिती सरकारच करू लागले. अशा सरकार केंद्रीत धोरणाने नोकरशाही ही बलाढ्य व बळकट झाली. परमिट राज्य अस्तित्वात आले. खाजगी उद्योगधंदे आणि मोठे उद्योगसमूह यांची त्या कारणाने गळचेपी झाली.

या काळात परदेशातून बऱ्याच वेगवेगळ्या कामाकरीता मदतीचा ओघ सुरू झाला. अमेरिका, युरोपातील भांडवलशाही राष्ट्रे तसेच सोविएत युनियन सारखी साम्यवादी राष्ट्रे भारतास वेगवेगळ्या विकासकार्यक्रमाकरिता मदत देऊ लागली. ही सर्व मदत सरकारी यंत्रणेतून वापरली जाऊ लागली. तसे बघितले तर स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या २० वर्षात भारताचा अर्थविकास इतका वाईट नव्हता. त्या काळात वार्षिक ३.५ टक्के विकास वेग होता आणि हा विकासवेग स्वातंत्र्यपूर्व काळातील विकासवेगाच्या जवळजवळ तिप्पट होता.

राजकीय पातळीवर पण भारतात त्याकाळी एक स्थिरता होती. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारा पक्ष म्हणून काँग्रेस ओळखला जात होता. भारतातील बहुतांशी राज्यात तसेच केंद्रात काँग्रेसची सरकारे होती. राज्य व केंद्र सरकार यांच्यात बहुतांशी सलोख्याचे संबंध होते. या कारणाने एक निरपेक्ष लोकशाही असणारा तसेच धर्मनिरपेक्षता हा मध्यबिंदू ठेवून साम्यवादाचा सर्वांगीण विकासाकरिता उपयोग करणारा देश म्हणून भारत ओळखला जाऊ लागला. याचे सर्व श्रेय काँग्रेसमधील प्रगल्भ व जाणते नेतृत्व तसेच एकपार्टी पद्धत याला दिले जाते.

एकोणिसशे सत्तर नंतर मात्र भारतातील परिस्थितीने वेगळेच वळण घेतले. चीन आणि पाकिस्तान बरोबरची युद्धे तसेच बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात भारताने केलेली मदत या कारणाने जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा वेगळी झाली. एक अलिप्त राष्ट्र अशी भारताची भूमिका स्वातंत्र्योत्तर काळात होती. त्या भूमिकेस तडा गेला. अंर्तगत पण बऱ्याच बदलास सुरूवात याच काळात झाली. राज्य सरकारने थोडीशी प्रबल झाली. विंध्य पर्वतापलीकडे राज्यात सामाजिक परिर्तनाने चांगलाच जोर धरला. परंतु, उत्तरेकडील राज्ये मात्र याबाबतीत कमी पडली. याकारणाने एक पक्ष – एक छत्र पद्धतीला तडा गेला. त्याचबरोबर पंजाब, उत्तरपूर्व राज्ये तसेच आंध्र प्रदेश वगैरे राज्यात दहशतवाद आणि विध्वंसक स्वतंत्र होण्याच्या वृत्तीने जोर धरला. काश्मिरचा प्रश्न पण

होताच. एकंदरीत सामाजिक आणि राजकीय ताणतणावातून अस्थिरतेला वाव मिळाला.

या सर्व गोष्टींचा परिणाम आर्थिक स्थितीवर होणे स्वाभाविक होते. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या तीस वर्षात राष्ट्रहिताच्या दृष्टीने उद्योगधंद्यावरील नियंत्रण केंद्र सरकारने आपल्या हातात ठेवले. वास्तविक कांही महत्त्वाच्या आणि ज्यांच्या बाबतीत जास्त भांडवली खर्चाची गरज असते, अशा वस्तूंच्या बाबतीत उद्योगधंद्याचे नियंत्रण केंद्र सरकारने काही काळाकरिता स्वत:कडे घेण्याची जरूरी होती. परंतु, सर्वच बाबतीत उद्योगधंद्यांचे नियंत्रण स्वत:कडे घेऊन केंद्र सरकारने एक प्रकारे आर्थिक विकास संकुचित केला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नोकरशाही इतकी बलाढ्य आणि मजबूत झाली की, ती सर्वस्वी कर्ताकरविता झाली. याकारणाने व्यक्तीकेंद्रीत भ्रष्टाचाराला गती आली. नियंत्रणे ही सार्वजनिक हिताला बाधक व व्यक्तिगत लाभाला सुखकारक ठरली.

५० वर्षांच्या स्वातंत्र्याने आपणास काय शिकविले असे जर कोणी आपल्याला विचारले तर टी.एस.इलियटच्या शब्दांत आपण हे कबूल केले पाहिजे की, आम्हाला अनुभव भरपूर मिळाला, पण अर्थ समजला नाही. सी.राजगोपालचारी, एक महान तत्त्वज्ञ आणि ज्येष्ठ शैक्षणिक तज्ज्ञ होते. सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल तुरूंगात असताना आणि ही जानेवारी १९२२ ची घटना आहे. त्यांनी आपल्या दैनंदिनीत लिहिले, आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर निवडणुका आणि त्यांच्या समवेत येणारा भ्रष्टाचार, अन्याय, पैशाची सत्ता आणि जुलूम जबरदस्ती नि प्रशासनातील गलथानपणा या गोष्टींना एवढे उधाण येईल की, जीवन नकोसे वाटू लागेल... स्वातंत्र्य मिळण्याचा एकच फायदा होणार आहे आणि तो म्हणजे समाज म्हणून आपल्याला दुसऱ्या कोणापुढेही झुकावे लागणार नाही किंवा अपमान सहन करावा लागणार नाही.

आपण जर शिक्षण सार्वत्रिक करू शकलो, तरच हे सारे टाळण्याची काही तरी आशा आहे. कारण शिक्षणामुळेच आपण नागरिकांच्या मनावर लहानपणापासूनच सुद्वर्तन, परमेश्वरासंबंधीचा धाक व प्रेमभाव यांचे संस्कार करू शकू. आपण जर हे करू शकलो, तरच हे स्वराज्य सर्वांना सुखदायी ठरेल. नाहीतर स्वराज्य येऊनही अन्याय होतच राहतील.

आपल्या देशाच्या आजच्या अवस्थेबद्दलचे किती अचूक चित्र राजाजींनी ८० वर्षापूर्वी रेखाटले होते! परंतु, त्या चित्रातच दूरच्या भविष्यकाळाचे आश्वासनही लाभते.

याची प्रचिती गेल्या २० वर्षात येऊ लागली आहे. १९८० सालानंतरच्या काळात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टीने भारत हा एक क्रांतिकारक देश गणला जाऊ लागला. वेस्ट इंडीजमध्ये जन्मलेले ब्रिटीश लेखक व्ही.एस.नायपॉल यांनी प्रक्रियेस सद्य:परिस्थितीत दशलक्ष बंडे, असे म्हटले आहे. त्यांनी या क्रांतीस रक्तरंजित क्रांती असे संबोधले नाही आहे. तर हळूहळू होणारी, परंतु, निश्चित दिशा असलेली क्रांती असे म्हटले आहे. भारतीय पुरातत्त्व अभ्यासक श्री.एम.एन.श्रीनिवास

यांनी या बदलाचे वर्णन करताना असे म्हटले आहे की, भारतीय लोक सध्या ही क्रांती जगत आहेत आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे याची ना भारतीयांना ना भारताबाहेर राहणाऱ्या लोकांना कल्पना आहे.

सर्वात महत्त्वाची परंतु, अत्यंत धीम्या गतीने चालू असलेली क्रांती ही आर्थिक क्षेत्रात होत आहे. या क्रांतीस सुरूवात झाली १९९१ मध्ये. सरकार केंद्रीत आर्थिक चौकट आता ढिली होऊ लागली आहे आणि खाजगीकरण, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि उपभोक्ता केंद्रीत अर्थकारण याला आता महत्त्व येऊ लागले आहे. सरकारने सर्वच क्षेत्रात लुडबूड न करता फक्त राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींच्या निर्मितीतच लक्ष घालावे हा विचार आता जोर धरू लागला आहे. अगदी जास्त भांडवली गुंतवणूकीची गरज असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या बाबतीतही, म्हणजे वीजनिर्मिती व तिचे वाटप, रस्ते बांधणे आणि वाहतूक, पाणी पुरवठा, टेलिफोन आणि संदेश दळणवळण अशा क्षेत्रातही खाजगीकरणाला चालना मिळू लागली आहे. त्या कारणाने ग्राहकाला फायदा होऊ लागला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नोकरशाहीचा पगडा आता हळूहळू कमी होऊ लागला आहे. या सर्वाला जोड मिळाली आहे. इतर क्षेत्रात झालेल्या क्रांतीची. हरित क्रांतीने अन्नधान्याचा, धवलक्रांतीने दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा आणि नुकत्याच झालेल्या नील क्रांतीने संदेश दळणवळणाचा प्रश्न सुटला आहे. तसेच सध्याच्या अर्थकारणात सेवा–सुविधा उद्योगास महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व सेवा–सुविधा उद्योगाचा मुलभूत स्त्रोत हा संगणक–सॉफ्टवेअर उद्योगात आहे. भारताने या क्षेत्रात गेल्या दहा वर्षात खूपच मजला मारली आहे. वाढत्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राने भारताला खूपच मदत केली आहे. गेल्या कित्येक वर्षात प्रथमच भारताची परदेशी चलनाची गंगाजळी जवळजवळ ८८ बिलियन डॉलर्स इतकी झाली आहे.

हे चित्र जरी आशावादी असले तरी अजूनही कित्येक बाबतीत आपण मागे आहोत. वाढती लोकसंख्या आणि गरिबी अजूनही आपल्याला भेडसावत आहे. यातच केंद्र व राज्यसरकारने यांच्यातील संबंधात फरक पडत चालला आहे. प्रबळ आणि सशक्त केंद्र सरकार आणि त्याच्या छायेत वाढणारी राज्ये ही संकल्पना आता मोडीत निघाली आहेत. राज्य सरकारने स्वतःच्या विकासाबाबत आता जागृत झाली आहेत. प्रत्येक राज्य सरकार आपले हक्क आणि आपला विश्वास याबाबत स्वतंत्रपणे विचार करू लागले आहे. याचप्रमाणे सर्वत्र सामाजिक मंथन होत आहे. सामाजिक मंथन आणि आर्थिक सबलतेचा प्रयत्न हा प्रत्येक राज्याचा अंगीभूत अविभाज्य घटक बनला आहे. एक गोष्ट मात्र निश्चितपणे घडली आहे. केंद्र सरकारचे सार्वभौमत्व सर्व राज्यांना मान्य आहे. त्या कारणानेच भारताचे एक प्रबल राष्ट्रांत रूपांतर झपाट्याने होत आहे. आणि याच कारणाने आणखी कांही दशकांत विकसित भारताचे आपले स्वप्न साकार होऊ शकते.

आपल्या देशाने प्रगतीसाठी लोकशाहीचा मार्ग स्वीकारला आहे. लोकशाहीमध्ये बहुसंख्यांकांचे मत स्वीकारले जाते हे खरे आहे. या कारणानेच लोकांनी लोकांकरिता निर्माण केलेले आणि लोकमतांचा आदर करीत चालविलेले राज्य म्हणजेच लोकशाही असे म्हणतात. परंतु, सबळ लोकशाहीत प्रत्येक गोष्टींची आणि विधानांची सत्यासत्यता आणि ग्राह्य–ग्राह्यता पडताळून पाहण्याची क्षमता असलेल्या लोकांचे बहुमत असते. आपल्याकडे अशा लोकांची चणचण जाणवत आहे. सदृढ लोकशाहीत कांही लिखित नियमांचे आणि बऱ्याचशा अलिखित संकेतांचे पालन व्हावयास लागते. हे ध्यानात घेण्याइतके लोक ज्या देशाची शिक्षणपद्धती तयार करू शकते, ती शिक्षणपद्धती योग्य असते. प्रगल्भ सार्वजनिक जीवनाचे उच्च निकष भारतात प्रस्थापित व्हायला बराच काळ लागत आहे हे आपले दुर्दैव आहे. ज्यांची अंमलबजावणी करता येते, अशा संकेताचे कटाक्षाने पालन करण्याची सवय आपल्याला मुळीच लागली नाही. सामाजिक व्यवहारातील, तसेच समाजस्वास्थ्यातील कित्तीतरी उदाहरणे या विधानाच्या पुष्टीसाठी देता येतील. उलट ज्यांची अंमलबजावणी करता येत नाही, असे कायदेही जुमानायचे नाहीत, ही प्रवृत्ती सध्या वाढीला लागली आहे. या प्रवृत्तीच्या खंडनाची गरज आहे. अनुशासनाची, स्वयं–अनुशासन आणि आत्मसंयमन याची कास आपण धरण्याची गरज आहे. ज्या देशात कठोर आत्मसंयमन, मग ते वैयक्तिक, सामाजिक किंवा आर्थिक बाबतीत असो–पाळले जात नाही, त्या देशाची दुरावस्था होते. नवीन शतकात, विद्यार्थी मित्रांनो, तुमच्याकडून अपेक्षा आहे स्वयंशासनाची. आपण भारतीय स्वभावत: दैववादी असल्यामुळे फार निष्क्रिय झालेलो आहोत. आपला हा पारंपारिक दुर्गुण आपण टाकून द्यायला हवा. सर्वप्रकारच्या शासनपद्धतीमध्ये लोकसत्ताक शासनयंत्रणा हा अत्यंत कठीण प्रकार होय. लोकशाहीचे फक्त रक्षण करून भागत नाही. लोकशाही ही सशक्त व चालती असावी लागते. विकास ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया असून, त्यासंबंधात आपल्या देशापुढे उभे असलेले प्रश्न अत्यंत प्रचंड स्वरूपाचे आहेत. यांना जर तोंड द्यावयाचे असेल तर गुणवत्तेला पर्याय नाही. सर्वच क्षेत्रात गुणवत्तेला वाव देण्याचे धोरण अंगिकारले नाही, तर लोकांचा लोकशाहीवरचा विश्वास उडून जाण्याचा धोका संभवतो. २१ व्या शतकात ज्ञान हेच सामर्थ्य ठरणार आहे. जेव्हा ज्ञान आणि सामर्थ्य एके ठिकाणी नांदते, तेव्हाच देश वैभवशाली प्रगती करू शकतो.

विद्यार्थी मित्रांनो.... आपल्याला वाटत असेल की, वरील विवेचनाचा माझ्या वैयक्तिक जीवनाशी काय संबंध आहे? आपल्या मनात विचार येत असतील की, या गोष्टींचा मला काहीही फायदा नाही. आम्हाला गरज आहे नोकऱ्यांची. मला तुमची अडचण समजते. तुमच्या आजच्या अवस्थेबद्दल मला सहानुभूतीही वाटते. परंतु, केवळ इच्छा बाळगून वा तशा घोषणा करून बेकारी दूर करता येत नाही

हे लक्षात ठेवा. गरज आहे डोळसपणे विचार करण्याची. बदलत्या परिस्थितीबाबत योग्य ती माहिती मिळविण्याची. याबाबत मी आता विवेचन करणार आहे.

जगात आणि भारतातही आता नोकरी व उद्योगधंदे याबाबत बदल होत आहेत. पायाभूत आणि गाभा उद्योगांचे आता विकेंद्रीकरण होऊ लागले आहे. कोणताही उद्योग आता एका गावात केंद्रीत होत नाही. कच्चा माल पुरवठा, वस्तुनिर्मिती, वस्तुंचे वाटप आणि विक्री तसेच वित्त पुरवठा आणि या सर्वांसाठी लागणारे व्यवस्थापन यांचे विकेंद्रीकरण होत आहे. एकाच छत्राखाली सर्वच गोष्टी करावयाची पद्धत आता त्याज्य झाली आहे. याकारणाने नोकरवर्गाचे विकेंद्रीकरण होत आहे. वेगवेगळ्या स्वबळावर उद्योगास पूरक सेवा देणाऱ्या लोकांची गरज वाढत आहे. त्या कारणाने नव्या संधी उपलब्ध होत आहेत.

उद्योगाचा आणखी एक प्रकार झपाट्याने विकसित होत आहे. तो म्हणजे सुविधा–उद्योग. सुविधा–उद्योग दोन प्रकारात मोडतात. एक प्रकार म्हणजे मोठे सुविधा उद्योग. उदा.टपाल व्यवस्था, टेलिफोन, प्रवाशांची आणि मालाची वाहतूक, बँका, स्वास्थ्य या सर्वांशी निगडित सेवा. या व्यापक व अधिक भांडवल लागणाऱ्या असतात. दुसरा प्रकार म्हणजे व्यक्तीला–कुटुंबाला किंवा एका छोट्या गटाला लागणाऱ्या सुविधा. त्यात अगदी पाणी किंवा विजेची बिले भरण्यापासून ते बँकेचे व्यवहार करण्यापर्यंत, ते एखाद्या छोट्या प्रसंगाचे संपूर्ण व्यवस्थापन करण्यापर्यंत सर्वांचा समावेश होतो. प्रगतिशील व विकासाकरिता झगडणाऱ्या समाजाला वैयक्तिक पातळीवर बऱ्याच सुविधांची गरज असते. पैसे देऊन सेवा घेणे त्याला सोयीस्कर वाटते. अशा सेवांचा हुशारपने शोध घेऊन त्या समाजाला पुरवविण्याचा चाणाक्षपणा तुम्ही अंगिकारला पाहिजे. पहिल्या प्रकारच्या मोठ्या सुविधा– उद्योगात पण आता खाजगीकरण व विकेंद्रीतता आली आहे. तात्पर्य काय, तर सरकारी नोकरीच्या जंजाळात न अडकता इतर उपलब्ध होणाऱ्या संधीचा फायदा उठविला पाहिजे. पुढील २० वर्षात सेवा आणि सुविधा उद्योग हा सर्वात जास्त संधी उपलब्ध करून देणारा आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सर्व परिवर्तनात ज्ञानाला फार महत्त्व प्राप्त होणार आहे. ज्ञान ही संज्ञा मी कांही अगदी अवजड किंवा बोजड गोष्ट दर्शक म्हणून वापरत नाही आहे. ती एक सर्वसमावेशक गोष्ट आहे. कोणतीही गोष्ट चांगल्यारितीने करण्याकरिता बरीच माहिती असावी लागते. याशिवाय या माहितीचा कुशलतेने वापर करण्याची क्षमता असावी लागते. या सर्वांना ज्ञान असे संबोधता येते. याचाच अर्थ बौद्धिक कुतूहल, वैचारिक स्वच्छता आणि प्रामाणिकपणे कष्ट करण्याची तयारी व्यक्तीला यश देतात. आज जेव्हा प्रगतीच्या व बदलाच्या अवस्थेतून आपण जात आहोत, तेव्हा या सर्व गोष्टींची फार गरज आहे.

आपण आज या विद्यापीठाची पदवी घेत आहात. एका अर्थाने आपल्या जीवनातला एक टप्पा पूर्ण होत आहे. पुढच्या काळात आपल्याला आपणांस आजवर मिळालेल्या ज्ञान आणि अनुभवाची

शिदोरी उपयोगी पडणार आहे. आपला भविष्यकाळ उज्ज्वल आहे. आपल्याला कास धरली पाहिजे क्रियाशीलतेची. एका वेगळ्या प्रकारच्या कार्य–संस्कृतीची! सातत्याने नावीन्याचा शोध घ्या. सकारात्मक आशावाद आत्मसात करा. जे लोक वर्तमानाचे भान न सोडता भविष्यात भरारी घेतात, ते स्वत: यशस्वी होतातच. परंतु, त्याहूनही अधिक म्हणजे जे आपल्या कुटुंबाला, समाजाला आणि पर्यायाने देशाला महान करतात, आपल्या हातून असे कार्य घडो अशी माझी सद्‌भावना आहे!

आपणा सर्वांना माझ्या शुभेच्छा. पुन:श्च एकदा आपल्या पदवीप्रदान समारंभास आमंत्रित केल्याबद्दल आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि माझे भाषण संपवतो.

❒❒❒